# सैन्यभरतीसाठी ‘अग्निपथ’!

## संरक्षण दलांच्या सेवेत ‘अग्निवीरां’ची चार वर्षांसाठी नियुक्ती

**पीटीआय, नवी दिल्ली**

**लष्कर, नौदल** आणि वायुदलातील सैन्यभरतीसाठी केंद्र सरकारने मंगळवारी ‘अग्निपथ’ योजना जाहीर केली. या सैनिकांची चार वर्षांच्या कंत्राटावर भरती केली जाईल. संरक्षणासंदर्भातील मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीत या योजनेला मंजुरी मिळाल्यानंतर संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली.

देशाच्या तिन्ही सैन्यदलांच्या प्रमुखांसह संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पत्रकार परिषद घेऊन या योजनेची घोषणा केली. ‘‘अग्निपथ भरती योजना हे एक क्रांतिकारी पाऊल आहे. त्यामुळे संरक्षण दलांना आणखी तरुण चेहरा *(पान २ वर)*



**मोबदला काय?** यंदा ४६,००० जणांची ‘अग्निवीर’ म्हणून भरती केली जाईल. ही भरती तीन महिन्यांतच सुरू होईल. त्यासाठी १७.५ ते २१ ही वयोमर्यादा असेल. पहिल्या वर्षी ‘अग्निवीरां’ना मासिक ३० हजार रुपये मोबदला मिळेल. त्यांना दुसऱ्या वर्षी ३३,०००, तिसऱ्या वर्षी ३६,५०० आणि चौथ्या वर्षी ४०,००० मोबदला मिळणार आहे. प्रत्येक ‘अग्निवीरां’ला ११.७१ लाख सेवानिधी मिळणार असून, हे उत्पन्न करमुक्त असेल. शिवाय, त्यांना सेवाकाळात ४८ लाखांचे विमाकवचही मिळेल.

### दीड वर्षांत दहा लाख नोकरभरती, केंद्राची घोषणा

**नवी दिल्ली :** विविध केंद्र सरकारी विभाग आणि मंत्रालयांनी आगामी दीड वर्षांत दहा लाख नोकरभरती करावी, अशी सूचना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. देशातील वाढत्या बेरोजगारीच्या मुद्द्यावर सरकार सातत्याने टीकेचे लक्ष्य ठरत असल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारी सेवेतील मनुष्यबळाचा आढावा घेऊन पंतप्रधान कार्यालयाने ही नोकरभरतीची घोषणा केली. त्यावरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सरकारला लक्ष्य केले. “आठ वर्षांपूर्वी युवकांना दरवर्षी दोन कोटी नोकऱ्या उपलब्ध करून देऊ, असे आश्वासन देऊन सत्तेवर आलेले सरकार आता दहा लाख नोकऱ्यांबाबतही खोटे आश्वासन देत आहे” अशी टीका त्यांनी केली. पान ९

### घाऊक महागाईदर १५.८८ टक्क्यांवर

**नवी दिल्ली :** किरकोळ महागाई दराने किंचित दिलासा दिला असला तरी घाऊक महागाई दराने ऐतिहासिक उच्चांकी पातळी गाठली आहे. घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दरात सरलेल्या मे महिन्यात १५.८८ टक्के वाढ नोंदविली गेली. एप्रिल २०२१ पासून सलग चौदाव्या महिन्यात घाऊक महागाई दर दोन अंकी स्तरावर कायम आहे.





राहुल गांधी यांची आजही ‘ईडी’कडून चौकशी पान ९

जुहू समुद्रात तीन तरुण बुडाले पान ४

अनिल परब यांना ‘ईडी’चे समन्स पान २

### २० लाखांची लाच घेताना सहाय्यक करआयुक्त ताब्यात

**ठाणे :** उपाहारगृहाच्या गेल्या वर्षीचे मूल्यांकन टाळण्यासाठी, तसेच वस्तू व सेवा कराचे नवे खाते काढून देण्यासाठी २० लाख रुपयांची लाच घेणाऱ्या सहाय्यक राज्य कर आयुक्त धनंजय शिरसाट याला मंगळवारी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले. याप्रकरणी ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याच्या अटकेची कारवाई रात्री उशिरापर्यंत सुरू होती. पान ४

# लष्करात चार वर्षांची नोकरी

## अग्निपथ योजनेची घोषणा, सामान्य सैनिकांप्रमाणेच लाभ

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने तिन्ही दलातील सैनिकांच्या भरतीसाठी नव्या अग्निपथ योजनेची घोषणा केली. वाढता वेतन आणि पेन्शन खर्च कमी करून अल्प काळासाठी सैनिकांची भरती करण्यात येणार आहे. त्यांना अग्निवीर संबोधण्यात येणार आहे. त्यांना चार वर्षे लष्करात सेवा करता येईल. सुरक्षा विषयाच्या मंत्रिमंडळ समितीच्या (सीसीएस) बैठकीत या योजनेला मंजुरी देण्यात आल्यानंतर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी पत्रकारांशी संवाद साधला. नौदलाचे प्रमुख एडमिरल आर. हरीकुमार म्हणाले की, या योजनेमुळे सशस्त्र दलाची ताकद वाढेल. या योजनेची घोषणा तिन्ही दलांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली. पूर्ण देशात भरती आयोजित करण्यात येणार आहे.



**या माध्यमातून भारतीय तरुणांना सशस्त्र दलांमध्ये अग्निवीर म्हणून सेवा देण्याची संधी मिळणार आहे. हा एक क्रांतिकारी उपक्रम आहे. सशस्त्र दलाला या माध्यमातून युवा चेहरा मिळणार आहे.**

राजनाथ सिंह,
संरक्षणमंत्री



### काय आहेत 'अग्निपथ'ची वैशिष्ट्ये?

**४६,०००**

**सैनिकांची यावर्षी तीनही दलात भरती**

**४४ लाख रुपये**

सेवेत असताना विकलांग झाल्यास देणार, याशिवाय शिल्लक नोकरीचे वेतनही दिले जाईल.

**११.७१ लाख रुपये**

प्रत्येक अग्निवीराला मिळणार

**२५%**

अग्निविरांना मेरिटच्या आधारावर नियमित कॅडरमध्ये समाविष्ट करणार

### कुणाला मिळू शकेल लाभ?

१७.५ ते २१ वर्षांचे तरुण

**पहिली भरती रॅली ९० दिवसात**

दहावी, बारावी उत्तीर्ण आवश्यक

### वेतन किती?

| | |
|---|---|
| **पहिले वर्ष** | ₹३०,००० |
| **दुसरे वर्ष** | ₹३३,००० |
| **तिसरे वर्ष** | ₹३६,५०० |
| **चौथे वर्ष** | ₹४०,००० |

सैन्यदलात दहा वर्षांसाठी शॉर्ट सर्व्हिस कमिशननुसार तरुणांची भरती करण्यात येते. हा काळ १४ वर्षांपर्यंत वाढविला जाऊ शकतो. वेतन व पेन्शन खर्च घटवण्याचा प्रयत्न या माध्यमातून होत आहे.

अग्निपथ योजनेचा उद्देश सशस्त्र दलातील भरतीमध्ये परिवर्तन आणणे, हा आहे. या योजनेमुळे सैन्यात युवा ताकद आणि अनुभव यांचे संतुलन राखण्यास मदत होईल. सैनिकांची भरती चार वर्षांसाठी होईल. मात्र, त्यातील काही जणांना सेवेत ठेवले जाईल.

जनरल मनोज पांडे,
सैन्य दलाचे प्रमुख

**स्थायी सैनिकांप्रमाणे पुरस्कार मिळणार मात्र, पेन्शन नाही**